**<u>नि.दि.दा.नं. ३७९/२०२२ मधील निशाणी १४ खालील आदेश</u>**

**<u>श्रीमंत भिसे व इतर वि बळी काकडे व इतर</u>**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी **दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ नियम १७** प्रमाणे दाखल केला आहे.

२. अर्जाच्या पृष्ठयर्थ वादी कथन की, वादींनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी विरूध्द मोजणी करुन दावा जमीनीच्या हददी कायम करुन खुणा करुन मिळणेबाबत व निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र. ४ चे नाव 'शोभा प्रभु चवरे' असे माहेरकडील नाव दाव्यात नमुद केले आहे. परंतु, सदरील नावांने प्रतिवादी क्र. ४ यांना समन्सची बजावणी होवु शकली नाही. त्यामुळे, प्रतिवादी क्र. ४ यांचे माहेरीकडील **'शोभा प्रभु चवरे'** ऐवजी सासरकडील नांव ' **मिनाक्षी बाळकृष्ण वाघमारे'** नमुद करुन प्रस्तुतच्या दाव्यामध्ये दुरूस्तीची विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ते ३ प्रस्तुत अर्जास आक्षेप नोंदविला आहे. त्यांनी प्रस्तुत अर्ज नांमजुर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी क्र. ४ ते १५ यांनी त्यांचे म्हणणे दाखल न केल्यामुळे त्यांच्या विरुध्द **'विना म्हणणे'** आदेश पारीत करण्यात आला.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. युक्तीवाद ऐकला. वादींनी सदरचा मोजणी करुन दावा जमीनीच्या हददी कायम करुन खुणा करुन मिळणेबाबत व निरंतर मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज जर मंजूर झाला तर दाव्याच्या मुळ स्वरुपात कुठल्याही प्रकारे बदल होणार नाही. वादी क्र. १ त्यांचे कथनाचे पुष्टयर्थ **नि.१५** वरती शपथपत्र दाखल केले आहे. प्रतिवादी क्र. ४ चे नाव 'शोभा प्रभु चवरे' असे माहेरकडील नाव दाव्यात नमुद केले आहे. परंतु, सदरील नावांने प्रतिवादी क्र. ४ यांना समन्सची बजावणी होवु शकली नाही. त्यामुळे,

प्रतिवादी क्र. ४ यांचे माहेरीकडील 'शोभा प्रभु चवरे' ऐवजी सासरकडील नांव 'मिनाक्षी बाळकृष्ण वाघमारे' नमुद करणेबाबत शपथेवर कथन केले आहे व सदरचे कारण संयुक्तिक आहे.

**५.** प्रस्तुतचा दावा स्थावर मिळकतीसंदर्भात असून वादी व प्रतिवादी यांचे दावा मिळकतीमध्ये मौल्यवान हक्क व अधिकार गुंतले आहेत. अशा प्रकारच्या अर्जाबाबत अत्यंत ताठर भुमिका घेणे योग्य होणार नाही. उलटपक्षी न्यायालयाने दाव्यातील परिस्थिती विचारात घेवून पक्षकारांना न्याय मिळेल अशा प्रकारची भुमिका घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट अर्ज नामंजूर केल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे.

**६.** दुरुस्तीचे स्वरुप पाहता मूळ दाव्याच्या परस्पर विरोधी बाब दिसून येत नाही. तसेच सदरील दुरुस्ती मान्य झाल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात कसलाही बदल होणार नाही. त्यामुळे प्रकरण गुणदोषांवर चालवून व दोन्ही पक्षांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेशी संधी देवून चालविणे न्यायोचित ठरेल. सबब, खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

**आ दे श**

१. वादीचा **नि. १४ अर्ज** मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने १४ दिवसांच्या आत प्रस्तावित दुरुस्ती करावी व दुरुस्ती दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2024.09.18 19:27:06 +0530

**(के. एस. कुलकर्णी)**

दि. १३/०९/२०२४

२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,

तुळजापूर

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | V.M. Gaikwad, Stenographer Gr. III (On Deputation) |
| Court | - | $2^{nd}$ Jt.CJJD & JMFC Tuljapur |
| Date | - | 13.09.2024 |
| Order signed by the Presiding Officer on | - | 13.09.2024 |
| Order uploaded on | - | 18.09.2024 |